महाराष्ट्र शासन

सेवाव्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा (परिवहन),
६०४ शेंडापार्क, आर.के.नगररोड, कोल्हापूर–४१६०१२.

दुरध्वनीक्रमांक :- (०२३१)२६९२३५१

e-mail – smdw.kop@gmail.com

जा.क्र/विकाको/तांत्रिक/दरपत्रक/ऑटो. स्क्रॅप/ १२०६ /२०२६, दिनांक :- १९/१०/२०२६.

प्रति,

………………

………………

………………

विषय :- सार्वजनिक आरोग्य विभागा-अंतर्गत कोल्हापुर मंडळस्तरावरील निरुपयोगी टायर्स - टयुब, बॅटरीज् (८०AH-१००AH, इ.), जळके ऑईल आणि ऑटोमोबाईल स्क्रॅप, स्टेपनी (रिम-सह) यांची ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्याकरीता सदर साहित्याची दरपत्रके सादर करणे बाबत.

मा. महोदय,

सार्वजनिक आरोग्य विभागा-अंतर्गत, कोल्हापुर मंडळस्तरावरील निरुपयोगी टायर्स-टयुब, बॅटरीज् (८०AH-१००AH, इ.), जळके ऑईल आणि ऑटोमोबाईल स्क्रॅप, स्टेपनी (रिम-सह) यांची ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्याकरीता उपरोक्त नमुद साहित्याची दरपत्रके मिळणे आवश्यक आहे.

यानुसार प्रस्तुत बाबींचे सर्व करांसह दर या कार्यालयास आपण सादर करावयाचे आहेत. सदर सर्व कर समावेशक दर आपले संस्थेच्या लेटर-हेडवर दिनांक ३०/१०/२०२६ रोजी दुपारी ३.०० पर्यत सिलबंद लिफाफ्यामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफ्यावर "सार्वजनिक आरोग्य विभागा-अंतर्गत कोल्हापुर मंडळस्तरावरील निरुपयोगी टायर्स-टयुब, बॅटरीज् (८०AH-१००AH, इ.), जळके ऑईल आणि ऑटोमोबाईल स्क्रॅप, स्टेपनी (रिम-सह) या साहित्यांची दरपत्रके" असा स्पष्ट उल्लेख करावा.

-प्रपत्र-

अ.क्र	ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावणेकरिता ठेवण्यात आलेल्या साहित्याचा तपशील	दर
१	वाहनांचे निरुपयोगी/ निकामी टायर्स टयुब्स (Tyres-Tubes) per Kg	
२	वाहनांचे निरुपयोगी/निकामी बॅटरीज् (Batteries) per Kg	
३	वाहनांचे निरुपयोगी/निकामी सुटेभाग साहित्य (Automobile Scrap in Kg)	
४	वाहनांचे निरुपयोगी जळके ऑईल (Burnt Oil in Liters)	
५	Stepney With Rim (Spare Wheel) in Kg	

दरपत्रके सादर करण्यासाठी दिनांक/वेळ आणि ठिकाण :

अ. क्र.	तपशील	कालावधी
१	या कार्यालयाचे सूचना फलकावर दरपत्रके सादर करणेसाठीचा नमुना प्रपत्र उपलब्ध असणे.	दि. २१/१०/२०२६ ते ३०/१०/२०२६ वेळ दु. ३.०० पर्यत.
२	दरपत्रके सादर करण्यासाठीची मुदत	दि. २१/१०/२०२६ ते ३०/१०/२०२६ वेळ दु.३.०० पर्यत.
३	दरपत्रके सादर करावयाचे ठिकाण	सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), शेंडापार्क, कोल्हापूर, ४१६०१२.

दरपत्रके उघडण्यासाठी दिनांक/वेळ आणि ठिकाण:

अ.क्र	तपशील	कालावधी
१	दरपत्रके उघडण्यासाठीचा दिनांक व वेळ	दि. ३०/१०/२०२६ वेळ दु.३.०० पर्यत.
२	दरपत्रके उघडण्याचे ठिकाण	सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), शेंडापार्क, कोल्हापूर, ४१६०१२.

वरीलप्रमाणे दरपत्रके उघडण्याच्या दिवशी दरपत्रके सादर केलेल्या संबंधित संस्थांचे प्रमुख अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींस समक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे.

दरपत्रके सादर करणेबाबतच्या अटी व शर्ती :-

१) सदर सेवा पुरवठादार संस्थाही प्रपत्रात नमूद साहित्य खरेदी करणेकरिता नोंदणीकृत असावी, सोबत शॉपअॅक्ट / फॅक्टरी अॅक्ट लायसन्स सादर करावे.

२) एका संस्थेने एकल दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. सोबत खालीलप्रमाणे विहीत "प्रपत्र-अ" सेवा/खरेदी प्राधिकाऱ्या बरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि एकल दरपत्रक देण्याबाबत दरपत्रकाराची "हमीपत्र" सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) दरपत्रके संस्थेच्या लेटर हेडवरच सही व शिक्क्यासह सादर करावे, तसेच त्याव GSTक्रमांक नमूद करण्यात यावा. सोबत GST प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

४) अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

५) दरपत्रकामध्ये खाडाखोड(Over writing)केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही.

६) दरपत्रकामध्ये सादर केलेले दर हे किरकोळ विक्री किमतीपेक्षा (एम.आर.पी.) पेक्षा जास्त नसावेत तसेच सर्व संभाव्य खर्चासह आणि करांसह असावेत.

८) विहीत नमुन्यात सादर न केलेले दर पत्रके स्विकारण्यात येणार नाही.

९) विहीत मुदती नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

१०) दर सादर करावयाच्या यादीमध्ये कुठल्याही प्रकारचा फेरफार केल्यास सदर दरपत्रके तात्काळ रद्द करण्यात येईल..

११) दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), कोल्हापूर यांचेकडे राहील.

सेवा व्यवस्थापक
विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा(परिवहन), कोल्हापूर.

<u>प्रपत्र - अ</u>

निविदाकारांनी द्यावयाचे हमीपत्र

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो कि, आमचा खरेदी प्राधिकारयाबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध/संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकाच निविदा सदर केली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.

दिनांक :-

निविदाधारकाची सही व संस्थेचा शिक्का